# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

**BOARD OF EXTRA MURAL STUDIES**
**SENIOR CITIZENS HELP CLUB**

**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, GANESHKHIND, PUNE-07**
**Email :** bems@unipune.ac.in
**TEL**. 020 - 25601147 / 25691983

**DIRECTOR** | **DR. DHANANJAY LOKHANDE**

**बहि:शाल शिक्षण मंडळ**
**ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे ७

मानद संचालक: डॉ. धनंजय लोखंडे
संदर्भ: बशिम/३१५/२०२०
दिनांक: १८/१२/२०२०

प्रति,
मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ०७

**विषय: विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा आयोजनाबाबत......**

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा-यांमधील सुप्त कलागुण विकसित व्हावेत, आणि त्यांच्या कल्पनेला वाव देण्याच्या दृष्टिने निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा या विभागामार्फत आयोजित करण्यात येणार आहेत. स्पर्धकाला दोन्ही ही स्पर्धेत भाग घेता येईल.

- **निबंधलेखन स्पर्धा:– विषय खालील प्रमाणे**
  १) ‘कोविड–१९’ विविध समाजघटकांना भेडसावणाऱ्या विविधांगी समस्या.
  २) समाज माध्यमांचे होणारे परिणाम.
  ३) भारतीय संविधान समजून घेताना.
  ४) माझ्या दृष्टिकोणातून समान नागरी कायदा.

- **चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा: – सदर स्पर्धेसाठी एक दिवस आधी विषय देण्यात येईल ( वेळ १० मिनिटे )**

**स्पर्धेचे नियम व अटी**

१) शिक्षकेतर सेवकांकडून निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेसाठीची नावे दिनांक ३१ डिसेबर २०२० पर्यंत आपल्या विभागप्रमुखांच्या मार्फत लेखी स्वरूपात आमच्या विभागाकडे कळवावीत. ( विहित नमुना वेबसाईटवर उपलब्ध आहे.)

२) चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेसाठी एकूण ३ स्पर्धक, त्यापैकी एकास संघप्रमुख असा संघ तयार करून, लेखी स्वरूपात विहित नमुन्यात माहिती भरून दिनांक ३१ डिसेंबर २०२० पर्यंत आमच्या विभागाकडे कळवावीत. ( विहित नमुना वेबसाईटवर उपलब्ध आहे.)

३) निबंधलेखनासाठी चार विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर स्पर्धकांस प्रत्यक्ष लेखन मंगळवार दिनांक १२/०१/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता वाणिज्य विभाग, ग्रंथालय हॉल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०७ या ठिकाणी उपस्थित राहावे. निबंधलेखनासाठी एक तास वेळ दिला जाईल व आवश्यक कोरे पेपर आमच्या विभागाकडून देण्यात येतील.

४) मंगळवार दिनांक १२/०१/२०२१ रोजी दुपारी १२.०० ते १.०० या वेळेत चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेचे विषय सोडत पद्धतीने जाहीर करण्यात येईल. यावेळी संघप्रमुखांनी वाणिज्य विभागाचे सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०७ या ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५) चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा बुधवार दिनांक १३/०१/२०२१ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० या वेळेत विद्यापीठाचे वाणिज्य विभाग, ऑडिटोरिअम हॉल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ०७ या ठिकाणी आयोजित करण्यात येईल. या ठिकाणी आपण उपस्थित राहणे आवश्यक आहे.

६) सदरील निबंधलेखन स्पर्धेत कमीत कमी १० स्पर्धकांनी व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेसाठी कमीत कमी १० संघ ( प्रत्येक संघात ३ प्रतिनिधी ) यांनी भाग घेतला तरच स्पर्धा आयोजित करण्यात येईल.

७) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

८) निबंधलेखनाची प्रत मिळणार नाही.

**—: बक्षिसे :—**

| **अ. क्र.** | **तपशील** | **निबंधलेखन स्पर्धा** | **चर्चा परिसंवाद संघ स्पर्धा** |
|---|---|---|---|
| १ | पहिले बक्षीस | रू. ५०००/— | रू. ६०००/— |
| २ | दुसरे बक्षीस | रू. ३०००/— | रू. ४०००/— |
| ३ | तिसरे बक्षीस | रू. २०००/— | रू. ३०००/— |
| ४ | उत्तेजनार्थ बक्षीस | रू. १०००/— | रू. २०००/— |

या स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिन समारंभावेळी बक्षिसे दिली जातील. स्पर्धकांनी निबंधलेखन व चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेसाठी नावे विभागप्रमुखांमार्फत मानद संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ यांच्याकडे ३१ डिसेंबर २०२० पूर्वी पाठवावीत आणि तपशीलासाठी त्यांचेशी संपर्क साधावा.

कळावे,

आपला,

Sd/-

डॉ. धनंजय लोखंडे
मानद संचालक,
बहि:शाल शिक्षण मंडळ व
ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष

**टिप: - १) करोना विषाणू संसर्ग टाळण्यासाठी स्पर्धकांनी आवश्यक ती खबरदारी घेणे आवश्यक आहे.**
**२) सर्व विभागप्रमुखांना विनंती की, सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

दिनांक .........................

प्रति,
मानद संचालक,
बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ०७

**विषय: निबंधलेखन स्पर्धेत भाग घेण्याबाबत.........**

महोदय,

मी खालील तपशीलाप्रमाणे सदर स्पर्धेत भाग घेत आहे.

| स्पर्धकाचे पूर्ण नाव मराठी व इंग्रजी मध्ये (दोन्ही भाषेत) लिहावे | मोबाईल नंबर | विभाग | पदनाम व सेवक क्रमांक/प्रकल्प क्रमांक | निबंधाचा विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

.............................................
( नाव:..................................................)
**स्पर्धकांची स्वाक्षरी**

.........................................
**मा.विभागप्रमुख स्वाक्षरी व शिक्का**

दिनांक .........................

प्रति,
मानद संचालक,
बहि:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ०७

**विषय: चर्चा परिसंवाद संघ स्पर्धेत भाग घेण्याबाबत.........**

महोदय,

आम्ही खालील तपशीलाप्रमाणे सदर स्पर्धेत भाग घेत असून खालील प्रमाणे संघ केला आहे.

| स्पर्धकांची पूर्ण नावे मराठी व इंग्रजी मध्ये (दोन्ही भाषेत) लिहावीत | मोबाईल नंबर | विभाग | पदनाम व सेवक क्रमांक/प्रकल्प क्रमांक | स्पर्धकाची स्वाक्षरी | विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का |
|---|---|---|---|---|---|
| **संघप्रमुख**<br>१) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |